22

3 (८) (8)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## " श्रीमती सिताबाई शांताराम वायंगणकर शिष्यवृत्ती " नियमावली

1. या शिष्यवृत्तीचे नामाभिदान " श्रीमती सिताबाई शांताराम वायंगणकर शिष्यवृत्ती " असे राहिल.
2. शिवाजी विद्यापीठाच्या " डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन" मध्ये राहून " कमवा आणि शिका " या योजनेअंतर्गत शिक्षण घेणाऱ्या एम्. एस्सी. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस सदरची शिष्यवृत्ती एम्. एस्सी. व्दितीय वर्षात देण्यांत येईल. विद्यार्थी / विद्यार्थीनीने एम्. एस्सी. भाग 2 मध्ये शिक्षण घेताना " डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन" मध्ये प्रवेश घेणे आवश्यक आहे.
3. देणगी दिलेल्या रक्कमेच्या व्याजातून येणाऱ्या रक्कमेमधून प्रशासकीय खर्च व कॉर्पस रक्कम वजा जाता उर्वरित रक्कमेमधून रू. 1,000/– ची ( दरमहा रू. 100/– प्रमाणे दहा महिन्यांसाठी) शिष्यवृत्ती देण्यांत येईल. व्याजातील काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती मूळ देणगी रक्कमेमध्ये जमा करण्यांत येईल.
4. या शिष्यवृत्तीची अंमलबजावणी मार्च / एप्रिल, 2005 च्या परीक्षेपासून करण्यांत येईल.
5. सदरची शिष्यवृत्ती संबंधित विद्यार्थी / विद्यार्थीनीस टपाल सेवेने वार्षिक देण्यांत येईल.
6. शिष्यवृत्ती संदर्भातील सर्व हक्क विद्यापीठ अधिकार मंडळाकडे राहतील.
7. या नियमावलीत भविष्यकाळात काही बदल करावयाचे असल्यास त्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना असतील.

<u>टिप:</u> सदरची नियमावली व्यवस्थापन परिषदेने दिनांक 29.04.2005 रोजीच्या सभेत ठराव क्रमांक 39 अन्वये मान्य केली आहे.